# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३**


जा.क्र.मनपा/उद्यान/325/२०२४-२५ दिनांक :- 30-07-2024

प्रति,
सिस्टम मॅनेजर,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

**विषय:- संकेतस्थळावर जाहिर आवाहन प्रसिध्द करणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका मार्फत पावसाळ्यात वृक्ष लागवड करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे सदर वृक्षलागवडीच्या पार्श्वभुमीवर नागरिकांनी जास्तीत जास्त वृक्षलागवड करणे करिता झाडे दत्तक योजना राबविणेकरिता सोबत जोडलेले जाहिर आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

(कल्पिता पिंपळे)
उप.आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

// जाहिर आवाहन //

महाराष्ट्र राज्य शासनात सुरू केलेल्या माझी वसुंधरा या मोहिमे अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक श्री.संजय श्रीपतराव काटकर यांच्या संकल्पनेतून, मिरा भाईंदर शहरातील वृक्ष प्रेमी यांना इच्छा असुनही स्वत:ची जागा उपलब्ध नसल्याने झाडे लावता येत नाहीत, अशा वृक्ष प्रेमीसाठी आणि शहरातील नागरीकांसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फ़त शहरात जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. नागरिकांनी त्या ठिकाणी भारतीय प्रजातीची किमान ८ ते १० फ़ुट उंचीची महानगरपालिकेने निश्चित करून दिलेल्या प्रजातीची झाडे स्वखर्चाने लावावी आणि पुढील दोन वर्ष त्याचे संगोपन आणि संवर्धन करावे एवढीच माफक अपेक्षा आहे. विशेष बाब म्हणजे जी व्यक्ती झाडांची लागवड, संगोपन व संवर्धन करणार आहे त्यांच्या नावाचा फ़लक झाडाला लावण्यात येणार आहे.

तरी मिरा भाईंदर शहरातील सर्व नागरीकांनी आणि वृक्ष प्रेमी, स्वयंसेवी संस्था, विकासक यांनी सदर अभिनव उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आणि शहरात वृक्षांची संख्या वाढून शहर आणखी सुंदर, निसर्गरम्य आणि प्रदुषण मुक्त होण्यासाठी सदर उपक्रमात मनापासून सहभागी व्हावे असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक श्री.संजय श्रीपतराव काटकर मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी केले आहे.

इच्छुक वृक्षप्रेमींनी व नागरिकांनी झाडे दत्तक योजनेत सहभागी होण्यासाठी नोंदणी करण्याकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका, उद्यान विभागाशी संपर्क साधावा, ही विनंती. टोल फ्री क्रमांक १८००२२४८४९ .

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (उदयान)
मिरा भाईंदर महानगरपालिका